GOVT. PERMISSION
M.Ed

महाराष्ट्र शासन

CHANDRASHEKHAR AGASHE COLLEGE OF PHYSICAL EDUCATION ★
82/83-84
PUNE 9
23-7-83

क्रमांक: युपीएफ-१०८३/७१८०/विशि-२.
शिक्षण व सेवायोजन विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १८ जुलै, १९८३.

प्रति,

कुलसचिव,
पुणे विद्यापीठ,
पुणे.

विषय :- चंद्रशेखर आगाशे कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, पुणे.
जून १९८३ पासूनच्या संलग्नीकरणाचा प्रस्ताव विद्यापीठ कायदा कलम ४३[४] अन्वये अनुमती देण्याबाबत..

महाशय,

आपले पत्र क्रमांक:सीएपी/२४२१-२२, दिनांक १३.६.१९८३ अन्वये पुणे येथील चंद्रशेखर आगाशे कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन या महाविद्यालयाच्या संलग्नीकरणाच्या विस्ताराबाबत विद्यापीठाच्या कायदा कलम ४३[४] अन्वये जो प्रस्ताव शासनाच्या अनुमतीसाठी आपण पाठविला आहे, त्याबाबत मला आपणांस असे कळविण्याचा आदेश आहे की, सदर प्रस्तावाबाबत विद्यापीठाच्या कायदा कलम ४३[५] अन्वये आवश्यक असलेली पुढील कार्यवाही विद्यापीठाने करण्यास शासनाची हरकत नाही.

| अ.क्र. | पाठ्यक्रम | विषय | तुकडी |
|---|---|---|---|

संलग्नीकरण व विस्तारासाठी

१] एम्.एड. [फिजिकल एज्युकेशन]

वरील जून १९८३ पासून संलग्नीकरणाच्या विस्तारात देण्यात आलेले प्राथमिक मंजूरी लक्षात घेऊन शासनाच्या समक्रमांकीय दिनांक १४.२.१९८३ अन्वये संलग्नीकरणाच्या नुतनीकरणात एम्.एड. [फिजिकल एज्युकेशन] या पदव्युत्तर अभ्यासक्रमास दिलेली प्राथमिक मंजूरी रद्द समजण्यात यावी.

याबाबत पुणे विद्यापीठाच्या कायदा १९७४ च्या कलम ४३[६] अन्वये आवश्यक असलेल्या [१] स्थानिक चौकशी समितीचा अहवाल, [२] विद्वत परिषद/कार्यकारी परिषद/सिनेट यांच्या ठरावाच्या प्रती व [३] शासकीय परिपत्रकानुसार विद्यार्थी संख्येबाबतची आवश्यक असलेली माहिती यास सादर केल्यानंतर विद्यापीठ कायदा कलम ४३[६] व [७] अनुसार प्राप्त झालेल्या अधिकारानुसार अंतिम मंजूरीचा अधिकृत शासकीय निर्णय निर्गमित करण्यात येईल.

आपला विश्वासू,

19

[ गो० भा० घोरे ]
... सचिव, महाराष्ट्र शासन

Scanned with CamScanner